2 6 SEP 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक आघाडीच्या संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे २० संशोधक

## स्टॅनफोर्ड विद्यापीठाची यादी : सार्वकालिक कामगिरीच्या आधारे पाच जणांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची वर्ष २०२५ साठीची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली असून, यात शिवाजी विद्यापीठाच्या २० संशोधकांनी स्थान प्राप्त केले आहे.

यात प्र-कुलगुरू तथा ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रमोद पाटील (पदार्थ विज्ञान) यांच्यासह निवृत्त प्रा. ए. व्ही. राव (पदार्थ विज्ञान), निवृत्त प्रा. सी. एच. भोसले (पदार्थ विज्ञान), डॉ. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ. विठोबा पाटील (पदार्थ विज्ञान), निवृत्त डॉ. संजय गोविंदवार (जैवरसायनशास्त्र), डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), डॉ. अण्णासाहेब मोहोळकर (पदार्थविज्ञान), डॉ. सागर डेळेकर (रसायनशास्त्र), डॉ. कल्याणराव गरडकर (रसायनशास्त्र), डॉ. तुकाराम डोंगळे (नॅनोसायन्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनोसायन्स), डॉ. हेमराज यादव (रसायनशास्त्र); डॉ. संजय लठ्ठे (पदार्थविज्ञान), डॉ. के. के. पवार (जैवतंत्रज्ञान), सचिन ओतारी (जैवतंत्रज्ञान), डॉ. अनिल घुले (रसायनशास्त्र), डॉ. शरदराव व्हनाळकर (पदार्थविज्ञान), डॉ. तेजस्विनी भट (पदार्थविज्ञान) आणि डॉ. मानसिंग टाकळे (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे.

सार्वकालिक कामगिरीच्या आधारेही संशोधकांची एक यादी तयार करण्यात आली असून, त्यामध्ये प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह डॉ. ए. व्ही. राव, डॉ. केशव राजपुरे, डॉ. ज्योती जाधव आणि डॉ. सी. एच. भोसले या पाच संशोधकांचा समावेश आहे.

**"या संशोधकांना जागतिक यादीमध्ये स्थान मिळण्यामागे त्यांनी गेल्या तीन दशकांहून अधिक काळ अव्याहतपणे केलेले संशोधन कारणीभूत आहे. या सर्वांनी विद्यापीठात एक संशोधन शिस्त निर्माण केली. त्यामुळे विद्यापीठात उत्तम संशोधन परंपरा निर्माण झाली आहे.**

**डॉ. डी. टी. शिर्के,**
**कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

### स्टॅनफोर्ड विद्यापीठाची प्रक्रिया

संशोधनाची गुणवत्ता निर्धारित करण्यासाठी स्टॅनफोर्ड विद्यापीठाने शोधनिबंधाला मिळणारी सायटेशन्स, एच निर्देशांक, सहलेखकत्व, संशोधन लेखकाची नेमकी भूमिका या घटकांचा सारासार विचार करून सर्वसमावेशक आणि सर्वमान्य अशी संयुक्त सूचक (सी स्कोर) निर्देशांक काढून ही जागतिक आघाडीच्या २ टक्के संशोधकांची क्रमवारी प्रसिद्ध केली जाते.



**२** टक्के संशोधकांची वर्ष २०२५ साठीची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 SEP 2025
लोकमत

# महाविद्यालयच पदवी प्रथम वर्षाचे मूल्यमापन करणार

## सर्व अभ्यासक्रमांना नियम लागू; तीन वर्षांसाठी मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सर्व अभ्यासक्रमांच्या पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षेचे मूल्यमापन करण्याची जबाबदारी महाविद्यालयाकडेच ठेवण्यात आली असून, तीन वर्षांपर्यंतची मान्यता शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत गुरुवारी देण्यात आली.

व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. याप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ.



व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत विविध विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. प्रथम वर्षातील परीक्षांचे मूल्यमापन महाविद्यालय स्तरावरच करण्यात येत होते. मात्र, यासाठी प्रत्येक सहा महिन्यांपर्यंतची मान्यता देण्यात येत होती. आता ही मान्यता थेट तीन वर्षांसाठी देण्याचा निर्णय झाला. काही महाविद्यालयांमधील बीबीएमसह काही अभ्यासक्रम रद्द करण्यात आले. नवीन महाविद्यालयांच्या मागणीसाठी एनसीपीएस ही सिस्टीम सुरू झाली असून, त्याच सिस्टीममधून ऑनलाईन प्रस्ताव पाठविण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. कुलगुरू डॉ. शिर्के व प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील हे निवृत्त होत असल्याने व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी त्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला. विद्यापीठाला दिलेल्या योगदानाबाबत कृतज्ञता व्यक्त केली.

> ३ वर्षांपर्यंतची मान्यता शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत देण्यात आली.

2 6 SEP 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# भाषा विविध संस्कृतींना जोडते : डॉ.पूरनचंद टंडन

**बेळगाव** (महा न्यूज अ‍ॅण्ड व्ह्यूज) :

भाषा ही देशातील, जगातील विविध संस्कृतींना जोडण्याचे महत्त्वाचे कार्य करते. त्यामुळे हिंदीसह सर्वच भाषांचा आपण सन्मान केला पाहिजे, असे प्रतिपादन दिल्ली विश्व विद्यालयातील माजी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ.पूरनचंद टंडन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या हिंदी विषयांतर्गत हिंदी दिनानिमित्त स्वतंत्र भारत में हिंदी की अनिवार्यता या विषयावर आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ.विलास शिंदे होते. यावेळी संचालक डॉ.कृष्णा पाटील,उपकुलसचिव विनय शिंदे, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

डॉ.टंडन म्हणाले की, देशाची ओळख भाषेमुळे होते. तसेच भाषेमुळे संस्कृतीची ओळख दिसून येते. जगामध्ये अनेक बोली भाषेचा वापर केला जातो. भारतामध्ये १६१८ बोली भाषा बोलल्या जातात. विद्यार्थ्यांना हिंदी भाषेमध्ये विविध क्षेत्रात करियरच्या अनेक संधी आहेत. भारतात अनेक प्रादेशिक भाषा असूनही राष्ट्रध्वजासमोर आपण नतमस्तक होतो, हे एकता, एकात्मतेचे निदर्शक आहे.

यावेळी डॉ.संजय चोपडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सोहम कदम यांनी सूत्रसंचालन केले. मेधा मुळे यांनी आभार मानले.

2 6 SEP 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांचा जगात डंका


▶ पान १ वरून : गत वर्षभरातील संशोधकीय कामगिरीच्या आधारे स्टॅनफोर्ड विद्यापीठाने ही निवड केली आहे. या २० संशोधकांव्यतिरिक्त राज्यासह जगभरात अन्य शिक्षण संस्था, विद्यापीठांत कार्यरत असणारे शिवाजी विद्यापीठाचे अनेक माजी विद्यार्थीही या दोन टक्के संशोधकांत समाविष्ट आहेत.

सार्वकालिक कामगिरीच्या आधारेही संशोधकांची एक यादी तयार केली असून त्यामध्ये प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह डॉ. ए. व्ही. राव, डॉ. केशव राजपुरे, डॉ. ज्योती जाधव आणि डॉ. सी. एच. भोसले या पाच संशोधकांचा समावेश आहे. गेली सहा वर्षे सातत्याने शिवाजी विद्यापीठाचे संशोधकीय महत्त्व जगाच्या नकाशावर हे संशोधक अधोरेखित करीत आहेत, ही अत्यंत अभिमानाची व आनंदाची बाब आहे, अशी भावना व्यक्त करीत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी या सर्व संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी म्हटले आहे की, या संशोधकांना जागतिक यादीमध्ये स्थान मिळण्यामागे त्यांनी गेल्या तीन दशकांहून अधिक काळ अव्याहतपणे केलेले संशोधन कारणीभूत आहे. या सर्वांनी विद्यापीठात एक संशोधन शिस्त निर्माण केली. त्यामुळे विद्यापीठात उत्तम संशोधन परंपरा निर्माण झाली आहे. हा वारसा पुढे घेऊन जाण्यास नवसंशोधकांनी सिद्ध व्हायला हवे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

2 6 SEP 2025
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# हिंदी अधिविभागात काव्य मैफिल

**कोल्हापूर,** (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज) :

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागाच्या वतीने हिंदी सप्ताहानिमित्त बुधवारी काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये नवकवींनी मोठ्या संख्येने उत्स्फुर्त सहभाग नोंदविला आणि स्वरचित कवितांचे सादरीकरण केले.

काव्य संमेलनामध्ये प्राध्यापक, संशोधक, एम.ए.च्या विद्यार्थ्यांनी आपल्या कवितांच्या माध्यमातून समाजातील वर्तमान स्थिती, कुटुंबाविषयाच्या भावना, तुटत चाललेले नातेसंबंध, प्रेम अशा वेगवेगळ्या गोष्टींवर भाष्य केले. यावेळी सुप्रिया पवार, अविनाश कांबळे, प्रमोद कांबळे, सतीश हरपडे, विक्रम राजवर्धन, गुलामगौस तांबोळी, पूजा दावणे, आराधना कदम आदी २५ कवींनी कवितांचे सादरीकरण केले.

अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. प्रकाश निकम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जयसिंग कांबळे यांनी केले. यावेळी डॉ. संतोष कोळेकर, डॉ. अक्षय भोसले, डॉ. गीता दोडमणी, डॉ. अनिल मकर, डॉ. सुवर्णा गावडे, प्रतीक्षा ठोंबरे व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव अध्यासनामध्ये आयोजित आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव. समवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, दै. 'पुढारी'चे समूह सरव्यवस्थापक अनिल पाटील, डॉ. जी. एस. कुलकर्णी, अतुल शिरोडकर, डॉ. शिवाजी जाधव आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन देशातील परिपूर्ण माध्यम संकुल बनावे

## डॉ. प्रतापसिंह जाधव; कुलगुरूंच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव अध्यासन देशातील परिपूर्ण अत्याधुनिक माध्यम संकुल बनावे, अशी अपेक्षा दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी व्यक्त केली.

विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव अध्यासनामध्ये गुरुवारी दुपारी आढावा बैठक झाली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, दै. 'पुढारी'चे समूह सरव्यवस्थापक अनिल पाटील यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्यापीठ इंजिनिअरिंग विभागाचे अधिकारी प्रमुख उपस्थित होते. डॉ. जाधव यांनी डॉ. ग. गो. जाधव अध्यासन कामाचा आढावा घेताना अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

विद्यापीठाच्या वतीने सध्या मास कम्युनिकेशन, बीए. फिल्म मेकिंग, पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम, सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंट्री फोटोग्राफी, सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग हे कोर्स सुरू आहेत. येणारा काळ हा प्रिंट, डिजिटल व चॅनलचा असणार आहे. त्याअनुषंगाने अध्यासनामार्फत टी.व्ही. अँकरिंग व रेडिओ जॉकी यासह विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे पत्रकारितेचे नवीन अद्ययावत कोर्सेस सुरू करावेत. कर्मचारी भरतीसंदर्भात प्रस्ताव उच्चशिक्षण विभागास देण्याचे नियोजन करावे. लवकरात लवकर अध्यासन इमारतीचे बांधकाम पूर्ण करावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

### डॉ. ग. गो. जाधव अध्यासन उभारणीत कुलगुरू डॉ. शिर्के यांचे मोलाचे योगदान

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा पदाचा कार्यभार ६ ऑक्टोबर रोजी पूर्ण होत आहे. डॉ. ग. गो. जाधव अध्यासन उभारणीत त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांनी प्रत्येक गोष्ट पूर्ण करण्यासाठी विशेष वेळ दिला आहे. त्याबद्दल दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी शिवाजी विद्यापीठ, डॉ. ग. गो. जाधव अध्यासन व 'पुढारी' माध्यम समूहाच्या वतीने आभार व्यक्त केले.

विद्यापीठाचे निवृत्त उपकुलसचिव जी. एस. कुलकर्णी यांनी अध्यासन इमारत बांधकामाचा आढावा घेतला. डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.

यावेळी उपकुलसचिव रणजित यादव, आर्किटेक्चर अमर उपाध्ये, निवृत्त उद्यान अधीक्षक चंद्रकांत जितकर, विद्युत अभियंता अमित कांबळे, तांत्रिक सल्लागार अतुल शिरोडकर, काँट्रॅक्टर बापू लाड, ठेकेदार सुनील नागराळे आदी उपस्थित होते.

2 6 SEP 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाच्या २० जणांनी पटकावले स्थान

## अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाची २०२५ ची क्रमवारी जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची २०२५ साठीची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली आहे. यात शिवाजी विद्यापीठाच्या २० संशोधकांनी स्थान प्राप्त केले आहे. कोल्हापूरसाठी ही अभिमानाची बाब आहे.



डॉ. पी.एस. पाटील

> गेली सहा वर्षे सातत्याने शिवाजी विद्यापीठाचे संशोधकीय महत्त्व जगाच्या नकाशावर संशोधक अधोरेखित करीत आहेत, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. संशोधकांना जागतिक यादीमध्ये स्थान मिळण्यामागे त्यांनी गेल्या तीन दशकांहून अधिक काळ अव्याहतपणे केलेले संशोधन कारणीभूत आहे. विद्यापीठात एक संशोधन शिस्त निर्माण केली. त्यामुळे विद्यापीठात उत्तम संशोधन परंपरा निर्माण झाली आहे.
>
> **- डॉ. डी.टी.शिर्के,** कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू तथा ज्येष्ठ संशोधक डॉ. पी. एस. पाटील (पदार्थविज्ञान) यांच्यासह निवृत्त प्रा. ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान), निवृत्त प्रा. सी. एच. भोसले (पदार्थविज्ञान), डॉ. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ. विठोबा पाटील (पदार्थविज्ञान), निवृत्त डॉ. संजय गोविंदवार (जैवरसायनशास्त्र), डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), डॉ. अण्णासाहेब मोहोळकर (पदार्थविज्ञान), डॉ. सागर डेळेकर (रसायनशास्त्र), डॉ. कल्याणराव गरडकर (रसायनशास्त्र), डॉ. तुकाराम डोंगळे (नॅनोसायन्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनोसायन्स), डॉ. हेमराज यादव (रसायनशास्त्र), डॉ. संजय लठ्ठे (पदार्थविज्ञान), डॉ. के. के. पवार (जैवतंत्रज्ञान), सचिन ओतारी (जैवतंत्रज्ञान), डॉ. अनिल घुले (रसायनशास्त्र), डॉ. शरदराव व्हनाळकर (पदार्थविज्ञान), डॉ. तेजस्विनी भट (पदार्थविज्ञान) आणि डॉ. मानसिंग टाकळे (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे. गत वर्षभरातील संशोधकीय कामगिरीच्या आधारे स्टॅनफोर्ड विद्यापीठाने ही निवड केली आहे. २० संशोधकांव्यतिरिक्त राज्यासह जगभरात अन्य शिक्षण संस्था, विद्यापीठांत कार्यरत असणारे शिवाजी विद्यापीठाचे अनेक माजी विद्यार्थी दोन टक्के संशोधकांत समाविष्ट आहेत.

पुढारी

# महाविद्यालयच करणार प्रथम वर्ष परीक्षांचे मूल्यमापन

## शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अभ्यासक्रमांच्या पदवी प्रथम वर्षांच्या परीक्षेचे मूल्यमापन करण्याची जबाबदारी महाविद्यालयाकडेच ठेवण्यात आली असून, यास तीन वर्षांपर्यंतची मान्यता शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत गुरुवारी देण्यात आली.

विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत विविध विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. प्रथम वर्षातील परीक्षांचे मूल्यमापन महाविद्यालय स्तरावरच करण्यात येत होते. मात्र, यासाठी प्रत्येक सहा महिन्यांपर्यंतची मान्यता देण्यात येत होती. आता ही मान्यता थेट तीन



वर्षांसाठी देण्याचा निर्णय झाला.

काही महाविद्यालयांमधील बीबीएमसह काही अभ्यासक्रम रद्द करण्यात आले. नवीन महाविद्यालयांच्या मागणीसाठी एनसीपीएस ही सिस्टीम सुरू झाली असून, त्याच सिस्टीममधून ऑनलाईन प्रस्ताव पाठवण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. कुलगुरू डॉ. शिर्के व प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील हे निवृत्त होत असल्याने व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी त्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला. विद्यापीठाला दिलेल्या योगदानाबाबत कृतज्ञता व्यक्त केली.

पुढारी

# पदवी प्रथम वर्षांच्या परीक्षा महाविद्यालयस्त्तरावर घेण्यासाठी तीन वर्षांपर्यंतची मान्यता

## • विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सर्व अभ्यासक्रमांच्या पदवी प्रथम वर्षांच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेण्यासाठी तीन वर्षांपर्यंतची मान्यता शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत गुरुवारी देण्यात आली.

व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत विविध विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. प्रथम वर्षातील परीक्षा महाविद्यालय स्तरावरच घेण्यात येत होत्या. मात्र, यासाठी प्रत्येक सहा महिन्यांपर्यंतची मान्यता देण्यात येत होती. आता ही मान्यता थेट वर्षासाठी देण्याचा निर्णय झाला.

काही महाविद्यालयांमधील बीबीएमसह काही अभ्यासक्रम रद्द करण्यात आले. नवीन महाविद्यालयांच्या मागणीसाठी एनसीपीएस ही सिस्टीम सुरू झाली असून त्याच सिस्टीममधून ऑनलाईन प्रस्ताव पाठवण्याबाबत बैठकीत चर्चा केली. कुलगुरू डॉ. शिर्के व प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील हे येत्या निवृत्त होत असल्याने व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी त्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला. .

पुढारी

# भाषा विविध संस्कृतींना जोडते : डॉ. टंडन

**कोल्हापूर :** भाषा ही देशातील, जगातील विविध संस्कृतींना जोडण्याचे महत्त्वाचे कार्य करते. त्यामुळे हिंदीसह सर्वच भाषांचा आपण सन्मान केला पाहिजे, असे प्रतिपादन दिल्ली विश्व विद्यालयातील माजी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. पूरनचंद टंडन यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या हिंदी विषयांतर्गत हिंदी दिनानिमित्त 'स्वतंत्र भारत में हिंदी की अनिवार्यता' या विषयावर आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. यावेळी संचालक डॉ. कृष्णा पाटील, उपकुलसचिव विनय शिंदे, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. यावेळी डॉ. संजय चोपडे यांनी प्रास्ताविक केले. सोहम कदम यांनी सूत्रसंचालन केले. मेधा मुळे यांनी आभार मानले.

2 6 SEP 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे २० संशोधक

**अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाची सन २०२५ साठीची क्रमवारी जाहीर**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची सन २०२५ साठीची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली आहे. यात शिवाजी

विद्यापीठाच्या २० संशोधकांनी स्थान प्राप्त केले आहे. गत वर्षभरातील संशोधकीय कामगिरीच्या आधारे स्टॅनफोर्ड विद्यापीठाने ही निवड केली आहे. याशिवाय राज्यासह जगभरात अन्य शिक्षण संस्था, विद्यापीठांत कार्यरत असणारे शिवाजी विद्यापीठाचे अनेक माजी विद्यार्थीही या दोन टक्के संशोधकांत समाविष्ट आहेत.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू तथा ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रमोद पाटील (पदार्थ विज्ञान) यांच्यासह निवृत्त प्रा. ए. व्ही. राव (पदार्थ विज्ञान), निवृत्त प्रा. सी. एच. भोसले (पदार्थ विज्ञान), डॉ. केशव राजपुरे (पदार्थ विज्ञान), डॉ. विठोबा पाटील (पदार्थ विज्ञान), निवृत्त डॉ. संजय गोविंदवार (जैव रसायनशास्त्र), डॉ. ज्योती जाधव (जैव रसायनशास्त्र), डॉ. अण्णासाहेब मोहोळकर (पदार्थ विज्ञान), डॉ. सागर डेळेकर (रसायनशास्त्र), डॉ. कल्याणराव गरडकर (रसायनशास्त्र), डॉ. तुकाराम डोंगळे (नॅनो सायन्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनो सायन्स), डॉ. हेमराज यादव (रसायनशास्त्र), डॉ. संजय लठ्ठे (पदार्थ विज्ञान), डॉ. के. के. पवार (जैव तंत्रज्ञान), सचिन ओतारी (जैव तंत्रज्ञान), डॉ. अनिल घुले (रसायनशास्त्र), डॉ. शरदराव व्हनाळकर (पदार्थ विज्ञान), डॉ. तेजस्विनी भट (पदार्थ विज्ञान) आणि डॉ. मानसिंग टाकळे (पदार्थ विज्ञान) यांचा समावेश आहे.

सार्वकालिक कामगिरीच्या आधारेही संशोधकांची यादी तयार केली आहे. त्यामध्ये प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह डॉ. ए. व्ही. राव, डॉ. केशव राजपुरे, डॉ. ज्योती जाधव, डॉ. सी. एच. भोसले या पाच संशोधकांचा समावेश आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, या यशामध्ये गेल्या तीन दशकांहून अधिक काळ अव्याहतपणे केलेले संशोधन कारणीभूत आहे. या सर्वांनी विद्यापीठात संशोधन शिस्त निर्माण केली. त्यामुळे विद्यापीठात उत्तम संशोधन परंपरा निर्माण झाली आहे. हा वारसा पुढे घेऊन जाण्यास नवसंशोधकांनी सिद्ध व्हायला हवे.

## स्टॅनफोर्ड विद्यापीठाची रँकिंग प्रक्रिया

संशोधनाची गुणवत्ता निर्धारित करण्यासाठी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने शोधनिबंधाला मिळणारी सायटेशन्स, एच निर्देशांक, सहलेखकत्व, संशोधन लेखकाची नेमकी भूमिका या घटकांचा सारासार विचार करून सर्वसमावेशक आणि सर्वमान्य अशी संयुक्त सूचक (सी स्कोर) निर्देशांक काढून ही जागतिक आघाडीच्या २ टक्के संशोधकांची क्रमवारी प्रसिद्ध केली जाते.

पुण्यनगरी

# हिंदी विभागात रंगली काव्य मैफल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागातर्फे हिंदी सप्ताहानिमित्त बुधवारी काव्य संमेलनाचे आयोजन केले होते. यामध्ये नवकवींनी उत्स्फूर्तपणे भाग घेऊन स्वरचित कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे उद्घाटन हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांच्या हस्ते झाले. संयोजन डॉ. प्रकाश निकम यांनी केले. यावेळी संशोधक विद्यार्थिनी सुप्रिया पवार, अविनाश कांबळे, प्रमोद कांबळे, सतीश हरपडे, विक्रम राजवर्धन, गुलामगौस तांबोळी, पूजा दावणे, आराधना कदम अशा २५ नवकवींनी कवितांचे सादरीकरण केले. सूत्रसंचालन डॉ. जयसिंग कांबळे यांनी केले. यावेळी डॉ. संतोष कोळेकर, डॉ. अक्षय भोसले, डॉ. गीता दोडमणी, डॉ. अनिल मकर, डॉ. सुवर्णा गावडे, प्रा. प्रतीक्षा ठोंबरे आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# अवकाश संशोधन आवश्यक : डॉ. सचिन पन्हाळकर

कोल्हापूर : प्रतिनिधी

विश्वाच्या रहस्यांचा वेध घेण्यासाठी अवकाश संशोधन अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे भूगोल विभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या भूगोल विभागाच्या वतीने 'अवकाश दिना' निमित्त आयोजित पोस्टर व मॉडेल प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. एस. पी. थोरात होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. जी. एस. उबाळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. व्ही. एम. पाटील यांनी करून दिला. आभार डॉ. एच. पी. पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. निशा सुर्वे यांनी केले. यावेळी पोस्टर व मॉडेल स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. डॉ. वैशाली पालकर, डॉ. सिद्धार्थ घोडेराव, प्रा. अश्विनी मुरावणे आदी उपस्थित होते.

सकाळ

# शिक्षण-संशोधनाला प्रेरणा, ऊर्जा देणारी शक्ती



- प्रा. डॉ. ज्योती जाधव, शिवाजी विद्यापीठ

करवीरनिवासिनी श्री अंबाबाई ही श्रद्धा, भक्ती, अध्यात्म आणि संस्कृतीचे अधिष्ठान मानली जाते. आई अंबाबाईच्या दर्शनाने मनात नवी उमेद, प्रेरणा आणि उत्साह निर्माण होतो. देवी ही ज्ञानाचे प्रतीक आहे. शिक्षणाला प्रेरणा आणि ऊर्जा देणारी आध्यात्मिक शक्ती आहे. तिच्या आशीर्वादातूनच विद्यार्थ्यांना ज्ञान, धैर्य, यशाचा मार्ग उजळतो. शास्त्रीयदृष्ट्या अतिशय परिपूर्ण असलेल्या या पुरातन मंदिरामध्ये प्रवेश केल्यानंतर अतिशय आल्हाददायक वातावरणाचा अनुभव येतो. देवीच्या दर्शनानंतर या मंदिरातून बाहेर पडताना समाधान लाभते. या मंदिराच्या परिसरातील आध्यात्मिक वातावरण भाविकांप्रमाणेच विद्यार्थ्यांच्या मनाला एकाग्रता, संयम आणि सकारात्मक विचार देणारे आहे. आजच्या युगात शिक्षण म्हणजे केवळ नोकरी अथवा व्यवसायाचे साधन नाही, ते आत्मविश्वास, प्रगती करण्याची आणि समाजासाठी योगदान देण्याची शक्ती आहे. देवीची आराधना केवळ धार्मिकतेपुरती मर्यादित नसून, ती जीवनमूल्यांची शिकवण देणारी आहे. शिस्त, धैर्य, संयम, आत्मविश्वास ही मूल्ये आईच्या उपासनेतून मनामध्ये रुजतात. श्रद्धा, परंपरा, संस्कृतीचा संगम असलेले हे शक्तिपीठ आज शिक्षणाच्या ऊर्जेशी नाते जोडताना दिसते. देवी आजच्या विद्यार्थ्यांना मातृत्वाचा आणि सामर्थ्याचा संदेश देते. देवीच्या मंदिराची विविध वैशिष्ट्ये असून, ती संशोधनाला प्रेरणा देणारी आहेत. त्यात या मंदिराचे ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व आणि पार्श्वभूमी, सुंदर शिल्पकला-नक्षीकाम, स्थापत्यशास्त्र, पुरातत्त्वीय स्थिती, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रभाव आदी विविध पैलूंवर अभ्यासक, तज्ज्ञांना संशोधनाची संधी आहे. देवीचे शक्तिस्वरूप हे नारीशक्ती असून, ही ऊर्जा शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक पिढीला नवी दिशा देत आहे. नव्या पिढीला सर्वप्रकारच्या संकटांना सामोरे जाण्याचे बळ देते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर
2 6 SEP 2025
सकाळ

# हिंदी अधिविभागात रंगली काव्य मैफल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागातर्फे हिंदी सप्ताहानिमित्त बुधवारी काव्य मैफल घेण्यात आली. त्यामध्ये नवकवींनी स्वरचित कवितांचे सादरीकरण केले. मैफलीचे उद्घाटन अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले. मैफलीत प्राध्यापक, संशोधक, एम.ए.च्या विद्यार्थ्यांनी कवितांच्या माध्यमातून समाजातील वर्तमान स्थिती, कुटुंबाविषयाच्या भावना, तुटत चाललेले नातेसंबंध, प्रेम अशा वेगवेगळ्या गोष्टींवर भाष्य केले. यावेळी सुप्रिया पवार, अविनाश कांबळे, प्रमोद कांबळे, सतीश हरपडे, विक्रम राजवर्धन, गुलामगौस तांबोळी, पूजा दावणे, आराधना कदम, आदी पंचवीस कवींनी सादरीकरण केले.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठामध्ये कवीसंमेलन उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागाच्यावतीने हिंदी सप्ताहानिमित्त काव्य संमेलन झाले. यामध्ये नवकवींनी स्वरचित कवितांचे सादरीकरण केले. सुप्रिया पवार, अविनाश कांबळे, प्रमोद कांबळे, सतीश हरपडे, विक्रम राजवर्धन, गुलामगौस तांबोळी, पूजा दावणे, आराधना कदम आदींनी कवितांचे सादरीकरण केले. अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांच्या हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन झाले. डॉ. प्रकाश निकम यांनी संयोजन केले. डॉ. जयसिंग कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. संतोष कोळेकर, डॉ. अक्षय भोसले, डॉ. गीता दोडमणी, डॉ. अनिल मकर, डॉ. सुवर्णा गावडे, प्रतीक्षा ठोंबरे आदी उपस्थित होते.